# राज्यात सायबर गुन्ह्यांत ५ वर्षांत १३०० कोटी लंपास

## अपुरी यंत्रणा असल्याने निपटारा नाही : शिंत्रे

प्रतिनिधी | पुणे

सायबर गुन्हेगारीचे प्रमाण जगभरात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ महाराष्ट्रात सन २०१९ पासून आतापर्यंत १३०० कोटींपेक्षा अधिक रक्कम ऑनलाइन फसवणुकीत नागरिकांना गमवावी लागली आहे. मात्र, जागरूकतेमुळे वेळेत तक्रारी केल्याने त्यापैकी १३४ कोटी रुपये चोरट्यांपासून वाचू शकले आहे. महाराष्ट्रात दररोज चार ते पाच हजार सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी येत असून दरदिवशी ३ कोटी रुपयांची रक्कम सायबर चोरटे ऑनलाइन लंपास करत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात येणाऱ्या सायबर तक्रारींचा वेळेत निपटारा करण्यासाठी पुरेशा यंत्रणेचा अभाव असल्याचे मत महाराष्ट्र सायबरचे पोलिस अधीक्षक संजय शिंत्रे यांनी शनिवारी व्यक्त केले.

सायबर सुरक्षा सोल्युशन्समध्ये काम करणाऱ्या क्विक हिल टेक्नॉलॉजीतर्फे पुण्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रो.व्ही.एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवार यांच्यासह २९ सहभागी संस्थांतील शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. संजय शिंत्रे म्हणाले, आजच्या डिजिटल युगामध्ये सायबर गुन्ह्यात वाढ होत आहे. ज्यामुळे सायबर सुरक्षितता व सुरक्षेबाबत जागरुकतेच्या महत्वाकडे दुर्लक्ष करता येऊ शकत नाही.

### यूपीएद्वारे रोज १५ लाख कोटींचे व्यवहार

यूपीएद्वारे देशात रोज १५ लाख कोटींचे व्यवहार देशात ऑनलाइन होत आहेत. विविध माहिती, फोटो, व्हिडिओ, आर्थिक व्यवहार याची ते देवाणघेवाण करत असल्याने त्यांचे प्रोफाईलवर सायबर चोरट्यांचे लक्ष्य असते. त्याचा गैरफायदा घेत विविध आमिषे दाखवून ते फसवणूक करत असल्याने त्यांना रोखण्याचे आवाहन सायबर पोलिसांसमोर आहे.